रे.मु. नं. ६०४/२०१३
हिराबाई वि. वसंत

MHSO130008772013

# <u>निशाणी क्र. ८२ वरील आदेश</u>

वादीने प्रतिवादी क्र. ९ व १० यांनी दाखल केलेल्या प्रतिदाव्याला लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र. ९ व १० यांनी सदरचा अर्जाला आक्षेप नोंदविला. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादीचा हा अर्ज मुदतीत नाही. प्रतिदाव्याला लेखी जबाब दाखल करण्याकरीता नऊ वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे. वादीने सदरच्या अर्जास कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केले नाही म्हणुन सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

२. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाला ऐकले. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ९ व १० यांनी निशाणी २३ वर प्रतिदावा दाखल केला परंतु ज्या वेळेस हा प्रतिदावा दाखल केला त्यावेळेस त्या प्रतिदाव्यावर या कोर्टाने सहाय्यक अधिक्षक यांचा अहवाल मागितला. तो अहवाल दि. १२/०३/२०२० रोजी दिला. त्यानंतर सदरचा प्रतिदावा रिड & रेकॉर्ड झाला. हा प्रतिदावा दिनांक ०३/०१/२०२२ रोजी रिड & रेकॉर्ड झाल्यामुळे त्या दिवसापासुन ९० दिवसाच्या आतमध्ये लेखी जबाब दाखल करणे गरजेचे आहे त्यामुळे या अर्जास नऊ वर्षापेक्षा जास्त विलंब झाला नाही तर नऊ महिन्याचा विलंब झालेला आहे.

३. मी या कथनाचा विचार केला. अभिलेखावरुन असे दिसते की, वादीने निशाणी २३ ची नक्कल दिनांक १०/०६/२०१३ रोजी घेतली होती. त्यामुळे वादीला प्रतिवादी क्र. ९ व १० यांनी वादी विरुध्द प्रतिदावा दाखल केला हि बाब माहित पडली. त्यामुळे जरी अधिक्षकांचा अहवाल मागितला तरी वादीला ज्या दिवशी प्रतिदावा दाखल केला त्या दिवसापासुन ९० दिवसांच्या आत लेखी जबाब दाखल करणे गरजेचे होते. वादी या तांत्रीक बाबीचा फायदा घेवु शकत नाही. वादीला नऊ वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला आहे. जरी विलंब झाला असला तरी सदरचा दावा सरस निरस मानाने वाटपाचा असल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र. ९ व १० यांनी वादी विरुध्द प्रतिदावा केला असल्यामुळे वादीला प्रतिदाव्यावर लेखी जबाब दाखल करण्याची संधी देणे गरजेचे वाटते. जर वादीला प्रतिदाव्यावर लेखी जबाब दाखल करण्याची संधी दिली नाही तर प्रतिदावा गुणदोषावर निकाली लागणार नाही. सबब झालेला विलंब लक्षात घेता हा अर्ज वादीवर

रुपये  २०००/- चा खर्च लावुन मंजुर करणे योग्य वाटते. करीता सदरचा अर्ज रुपये  २०००/- च्या खर्च लावुन मंजुर करण्यात येते आहे. सदरचा खर्च वादीने प्रतिवादी क्र. ९ व १० यांना या आदेशाच्या ७ दिवसांच्या आत दयावा अन्यथा हा आदेश रद्दबातल समजण्यात येईल.

Sd/-
(एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

बार्शी
दिनांक ०४/०१/२०२४.

रे.मु. नं. ६०४/२०१३
हिराबाई वि. वसंत

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 04/01/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 05/01/2024 |